महाराष्ट्र शासन

क्रमांक:हेतूप-२०१२/(३४/१२)/माशि-५
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक: २४ ऑगस्ट, २०१२

प्रति,
सचिव/अध्यक्ष,
पोदार एज्युकेशन ट्रस्ट,
८५, पोदार सेंटर, चामार बाग,
पोस्ट ऑफीस लेन, डॉ.आंबेडकर रोड,
परेल, मुंबई - १२.

विषय:- सी.बी.एस.ई. या मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलंग्नित होणा-या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानीत तत्त्वावरील शाळेला हेतूपत्र देण्याबाबत.
**पोदार एज्युकेशन ट्रस्ट, परेल, मुंबई द्वारा संचालित पोदार इंटरनॅशनल स्कूल.**

संदर्भ :- १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २०.०६.२०१२.
२) आपला दिनांक २२.०६.२०१२ चा प्रस्ताव.

सी.बी.एस.ई. मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलंग्नित होणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावरील इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी हेतूपत्र (Letter of Intent) प्राप्त होण्याकरीता शासनास **पोदार एज्युकेशन ट्रस्ट, परेल, मुंबई** या संस्थेचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

२. राज्यात सी.बी.एस.ई./आय.सी.एस.ई./आय.जी.सी.एस.ई./सी.आय.ई. इत्यादी देशातील व विदेशातील मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलंग्नित होणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावरील इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्याकरीता राज्य शासनाकडे अर्ज केल्यानंतर सदर शाळांना हेतूपत्र (Letter of Intent), परवानगी (Permission), मान्यता (Recognition) व ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) देण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती संदर्भाधिन क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शाळा सुरु करण्यापूर्वी विहित केलेल्या कार्यपध्दतीची पूर्तता करणे बंधणकारक राहणार आहे.

३. उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्रमांक २ अन्वये प्राप्त झालेल्या आपल्या अर्जाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अर्जात नमूद केलेल्या अकलुज - यावल, जि.भुसावळ - जळगांव, या ठिकाणी सी.बी.एस.ई. या मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलंग्नित कायम विनाअनुदान तत्त्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्याकरीता संदर्भाधिन क्रमांक १ च्या शासन निर्णयातील विहित केलेल्या खालील सर्व आठ अटी व शर्तींची पूर्तता होत असल्याने सदरहू हेतूपत्र देण्यात येत आहे.

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र

२) संस्थेची घटना

३) अद्ययावत पी.टी.आर.उतारा

Principal
Podar International School
Bhusawal

४) संस्थेच्या व्यवस्थापन समितीमध्ये वाद नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र

५) संस्थेच्याबाबतीत न्यायप्रविष्ठ प्रकरण नसल्याबाबतचे प्रमाणपत्र

६) प्रस्तावित शाळेसाठी उपलब्ध असलेली जमिनीसंबंधीचे अभिलेख

७)संस्थेच्या आर्थिक क्षमतेबाबतची कागदपत्रे

८) संस्थेच्या मागील तीन वर्षाचा लेखापरिक्षित ताळेबंद

४. जरी हे हेतुपत्र संस्थेस देण्यात आले असले तरी शाळा परवानगीचे आदेश शासनाकडून प्राप्त झाल्याशिवाय प्रत्यक्षात शाळा सुरु करता येणार नाही.

५. संस्थेला हेतूपत्राच्या आधारावर शाळा सुरु करता येणार नाही.

Society can not start the school on basis of Letter of Intent.

६. सी.बी.एस.ई./आय.सी.एस.ई./आय.बी./आय.जी.सी.एस.ई. या मंडळाच्या संलग्नतेसाठी हेतूपत्राचा वापर करता येणार नाही.

Letter of Intent cannot be used as N.O.C. For affilation with CBSE / ICSE / IB / IGCSE etc. Board

७. शाळेला सी.बी.एस.ई. / आय.सी.एस.ई./ आय.बी. / आय.जी.सी.एस.ई. या मंडळाकडून संलग्नता प्राप्त झाल्याशिवाय संस्थेला या मंडळाच्या नांवाचा उपयोग करता येणार नाही.

The name of CBSE/ICSE/IGCSE/IB etc. cannot be used by Society prior to affilation from concerned Board.

८. सदर संस्थेस ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासंबंधी हेतूपत्र देण्यात आले आहे त्याठिकाणी संबंधित संस्था जास्तीत जास्त १८ महिन्यांच्या आत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळा इमारत व भौतिक सुधारणा निर्माण करणे बंधनकारक राहील. सदर हेतूपत्रानुसार १८ महिन्यात उक्त सुविधांची पूर्तता करुन शाळा परवानगी साठी विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे प्रस्ताव सादर न केल्यास हेतूपत्र आपोआप रद्द होईल. तसेच हेतूपत्रास मुदतवाढ देता येणार नाही.

(विनोद बोंदरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव.

४) निवड नस्ती, माशि-५, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

Principal
Podar International School,
Bhusawal.